उल्हासनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९४६/२०२५ दि. २४/०७/२०२५

"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रात उल्हासनगर वाहतुक उपविभाग हददीत महात्मा फुले चौक ते शहाड रेल्वे स्टेशन चौक शिवाजी रोड या परिसरात मोठया प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. तसेच महात्मा फुले चौक ते शहाड रेल्वे स्टेशन चौक या रोडवर दोन्ही बाजुला मोठया प्रमाणात दुचाकी चारचाकी वाहने रस्त्यावर अस्ताव्यस्त उभी करतात. त्यामुळे सदर परिसरात मोठया प्रमाणात नियमित वाहतुक कोंडी होत आहे. सदर ठिकाणाची वाहतुक सुरळित व सुरक्षित राहावी वाहतुकीची कोडी होवु नये, याकरिता महात्मा फुले चौक ते शहाड रेल्वे स्टेशन शिवाजी रोड या रोडवर वाहतुक कोंडी टाळण्यासाठी व वाहतुक सुरळीत, सुरक्षित रहावी या करिता जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

अ.क्र.	पार्कींगचे ठिकाण	पार्कींगचा प्रकार	पार्कींगचे अंतर	वेळ
१	शहाड स्टेशन चौक ते महात्मा फुले चौक	पी– १	३०० मीटर	२४ तास
२	महात्मा फुले चौक ते शहाड स्टेशन चौक	पी– २	३०० मीटर	२४ तास

सदरची अधिसुचना मंजूर दिनांकापासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत आहे. नमुद अधिसुचनेबाबत काही हरकती अगर सुचना लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, कार्यालय, तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, ठाणे – ४००६०२ येथे प्राप्त झाल्यास त्या विचारात घेवून अधिसुचना कायम करण्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर च
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

CamScanner

प्रत कार्यवाहीसाठी :-

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ-४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/- सदरची अधिसूचना जागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एम.कक्ष, ठाणे

२/- सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :- सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर वाहतूक शाखा.

२/- म.न.पा. उल्हासनगर च्या संबधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner